राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ /तक्रार ७३५ /२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संभाजी दत्तात्रय दिवेकर | निवासी नायब तहसिलदार, तहसील कार्यालय, दौंड | तहसिलदार, तहसील कार्यालय, दौंड |

<u>तक्रार सुनावणी दिनांक -दि.१४/१२/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि. ०४/०९/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्रमांक २६७/२०२३/पुणे मध्ये सुनावणी घेऊन दि. २५/०४/२०२३ रोजी आदेश पारित केला.

सदर आदेशामध्ये तहसिलदार, तहसील कार्यालय, दौंड यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित केले होते. त्यांना आदेशित करण्यांत आले की, त्यांनी एक समिती गठीत करुन अभिलेखाचा एक महिन्याचा आत शोध घेण्याकरिता कारवाई करणे व अपिलार्थस माहिती पुरविणेबाबत आदेश दिले होते. जर अभिलेख आढळ होत नाही तर म.सा.अ.अ.२००५ नुसार अभिलेख गहाळ बाबत संबंधितावर योग्य कारवाई करुन अपिलार्थीस सूचना देण्याबाबत आदेश दिले होते. सदर आदेशाची अंमलबजावणी तहसिलदार, दौंड यांनी केली नाही अशी तक्रार तक्रारदार यांनी केली आहे."

त्यामध्ये दि. १४/१२/२०२३ रोजी सुनावणी आयोजित केली असता अपिलार्थी व (परिविक्षाधीन) श्री.नरेद्र दत्तात्रय शिंदे हजर होते. तर तत्कालीन जन माहिती अधिकारी गैरहजर होते.

सदर सुनावणीचे दिवशी तक्रारदार यांनी सूचीत केले की, मला माहिती मिळाली नाही. आयोगाचे ओदशाची अंमलबजावणी झाली नाही

सुनावणीचे वेळी निवासी नायब तहसिलदार तथा (परिविक्षाधीन) श्री.नरेद्र दत्तात्रय शिंदे हे हजर होते. त्यांनी आयोगास सूचित केले की, आयोगाचे आदेशाचे वेळी श्री. अरुण शेलार हे तहसिलदार दौंड होते. सध्याही तेच आहेत.

सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, संबंधित तहसिलदार दौंड श्री. अरुण शेलार यांनी केलेल्या कारवाईचा कोणताही अभिलेख आयोगास सादर केला नाही.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश.**

१.विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, दौंड श्री.अरुण शेलार यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी पुढील सुनावणीचे वेळी आयोगाचे आदेशावर केलेल्या कारवाईच्या पुराव्यासह हजर राहणे आवश्यक आहे. जर हजर राहिले नाही, पुरावा सादर केला नाही, तर जाणुनबुजून आदेशाची अंमलबजावणी केली नाही हे गृहीत धरुन पुढील कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. 5143/2023 / 13/12/23

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ